क्र.वैमाशा-१४/परिपत्रक/सिलींग/०९/ ८९५२
नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय, शासकीय कुटीर क्र.५,
फ्रि प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-२१.
दिनांक :- १८/०८/०९

# परिपत्रक

इलेक्ट्रॉनिक डिजीटल स्वरुपातील तोलन-मापन उपकरणांची पडताळणी व मुद्रांकन करताना सदर उपकरणांची पडताळणी न करता केवळ मुद्रांकन पट्ट्या ( Stamping Plates ) कार्यालयात आणून त्यावर निरीक्षकाकडुन मुद्रांकन केले जात असले बाबतच्च्या अनेक तक्रारी राज्यातील विविध भागातून या कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत. तसेच अशाच प्रकारच्या तक्रारी मा.मंत्री, अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेही आल्याबाबत दिनांक २० जूलै २००९ रोजी घेण्यात आलेल्या आढावा सभेत उल्लेख केला आहे. तोलन उपकरण सिलींगबाबत, वजने मापे कायदा व नियमातील तरतुदींचे पालन न झाल्यामुळे या उपकरणात बदल करुन गैरव्यवहार होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही त्यामूळे अशा प्रकारच्या तोलन उपकरणातील गैरव्यवहार रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सुचना मा. मंत्री महोदय यांनी केलेल्या आहेत.

वरील सर्व बाबींचा विचार करता, इलेक्ट्रॉनिक डिजीटल स्वरुपातील तोलन-मापन उपकरणांची पडताळणी व मुद्रांकन करताना नियमातील खालील बाबींचे काटेकोरपणे पालन करुन पडताळणी झाल्यानंतर आवश्यक त्या सर्व ठिकाणी तोलन उपकरणाला ( weighing instrument)सिल करण्यात यावे जेणेकरुन सिल तोडल्याशिवाय उपकराणामध्ये कोणत्याही प्रकारे फेरबदल करता येणे शक्य होणार नाही.

१) मानके वजने व मापे (सर्वसाधारण) नियम १९८७ च्या अनुसुची VII Heading B भाग II मधील नमुद केलेल्या तरतुदी तंतोतंतपणे अंमलात आणाव्यात.

२) मानके वजने व मापे ( सर्वसाधारण) नियम १९८७ च्या अनुसुची VII Heading B भाग II मधील नियम क्र. ७ (१) (i) ते ७ (१) (iii) (a) प्रमाणे सर्व माहिती - मशीन क्रमांक सह प्रदर्शित करणे व सदरची पट्टी ( Stamping Plate ) मशीनवर ७ (१) (iii) (c) मध्ये नमुद केल्याप्रमाणे लावण्यात यावी जेणेकरुन ती मुद्रांकनाचा ठसा विरुप केल्याखेरीज तोलन उपकरणापासून वेगळी करता येऊ शकणार नाही.

[ अधिक खुलाशासाठी व शिघ्रसंधर्भासाठी -

" *7(1) (iii) (c)*
The Plate shall be fixed by rivets or screws with one of the rivets of red copper or material having qualities recognized as similar. It should be possible to secure the head of one of the screws by means of lead cap inserted in device

... cannot be dismantled. The diameter of the rivet or of the lead cap should ... able to accommodate a stamp 4 mm in diameter." )

...ट्रॉनिक तोलन उपकरणाला एकापेक्षा जास्त दर्शक असतील तर प्रत्येक दर्शकाजवळ उपरोक्त नियम ... ) अन्वये माहिती दर्शविणे आवश्यक आहे.

... न उपकरणावर मुद्रांकन ठसा उमटविण्यासाठी ७ (२) (i) नुसार सोय असणे आवश्यक आहे. ...धिक खुलाशासाठी व शिघ्रसंधर्भासाठी -

*...(2) (i)*

... instrument shall have place for the application of verification marks. ...s Place shall, -

be such that the part on which it is located cannot be removed from the instrument without damaging the marks.

allow easy application of the marks without changing the metrological qualities of the instrument

be visible without the instrument having to be removed, when it is in service." ]

...के वजने व मापे (सर्वसाधारण) नियम १९८७ च्या अनुसुची VII Heading B भाग II मधील ... न ४ (१) (ii) (d) (e), ८(१) (iii) व Model Approval Certificate मध्ये देण्यात आलेल्या ...नुसार पडताळणी व मुद्रांकन करण्यात यावे.

...odel Approval Certificate मध्ये नमुद केल्याप्रमाणे मुद्रांकन पट्टी ( Stamping Plate ) ...व्यतिरीक्त संबंधीत तोलन उपकरण देखील अशा प्रकारे सील करण्यात यावे की, उपकरणाचे सील ... उपकरण उघडता येणार नाही व आतमध्ये कोणतेही फेरबदल करता येणार नाहीत. तसेच ...नची सुविधा असणा-या उपकरणांतील ऑटोकॅलिब्रेशन स्विच, उपकरणाचे सिल तोडून उपकरण ... चालू / बंद करता येऊ नये.

... निर्देशित केलेल्या बाबींची अंमलबजावणी करण्यासाठी खालील प्रमाणे मार्गदर्शक तत्वे निश्चित ... आहेत.

... सर्व बाबींची अंमलबजावणी करण्याकरीता उत्पादक / विक्रेता स्तरावर आवश्यक ते फेरबदल ... काही कालावधी लागण्याची शक्यता गृहीत धरुन आवश्यक ते फेरबदल करण्यासाठी दि. ...०९ पर्यंत उत्पादकांना वेळ देण्यात येत आहे. मात्र दि. ०१.१०.२००९ पासून नवीन इलेक्ट्रॉनिक तोलन ... प्रथम पडताळणी मुद्रांकन करतेवेळी निरीक्षकांना वरील नियम व तरतुदींचे पालन करणे अनिवार्य ... आहे.

ख) तसेच दि. ३०.०८.२००९ पर्यंत पडताळणी व मुद्रांकन होणा-या इलेक्ट्रॉनिक तोलन उपकरणांचे उपयोगकर्त्यांना आवश्यक ते बदल करण्यासाठी वेळ देणे आवश्यक असल्याने याबाबत सर्व संबंधितांना या कामासाठी दि. ३१.१२.२००९ पर्यंत वेळ देण्यात येत आहे. मात्र दि. ०१.०१.२०१० पासून फेरपडताळणी व मुद्रांकन करताना निरीक्षकांना वरील सर्व नियमांचे पालन करणे अनिवार्य राहील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ग) सर्व उपनियंत्रक, वैध मापन शास्त्र यांनी त्यांच्या विभागातील उत्पादक / विक्रेते/ दुरुस्तक/ उपयोगकर्ते यांना उपरोक्त फेरबदलाबाबत अवगत करावे. त्या दृष्टीने तालुका/जिल्हा/विभागीय स्तरावर व्यापक प्रसिद्धी द्यावी व त्याबाबतचा अहवाल मुख्यालयास सादर करावा.

घ) इलेक्ट्रॉनिक तोलन उपकरणे पडताळणी व मुद्रांकन केल्यानंतर सदर उपकरणात फेरबदल केल्यामुळे होणा-या गैरप्रकरास आळा घालण्यासाठी उपरोक्त सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या संबंधात यापुढे प्राप्त होणा-या प्रत्येक तक्रारीची गंभीर दखल घेण्यात येईल व कायद्यातील तरतुदीनुसार संबधितांवर कारवाई करण्यात येईल याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ङ) सदर परिपत्रकाची प्रत संबधित उपनियंत्रक व जिल्हा सहायक नियंत्रक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील निरीक्षक , वजन -माप उत्पादक/विक्रेते व दुरुस्तक यांना देऊन त्याची पोहोच घेऊन अहवाल सादर करावा.

च) वरील परिपत्रकानुसार पडताळणी व मुद्रांकनाचे कामकाज होत असल्याबाबतची खातरजमा संबधीत सहायक नियंत्रक व उपनियंत्रक यांनी करावी. वरील परिपत्रकाचे उल्लंघन आढळून आल्यास पर्यवेक्षण अधिकारी या नात्याने संबधीत सहायक नियंत्रक व उपनियंत्रक यांनाही जबाबदार धरण्यात येईल.

(डॉ. अंकुश धनविजय)
नियंत्रक, वैध मापन शास्त्र,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत सविनय सादर-

मा.प्रधान सचिव, अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग, महाराष्ट्र राज्य, मूंबई.

प्रत माहितीस्तव

खाजगी सचिव, (मा.मंत्री, अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग, महाराष्ट्र राज्य, यांचे)

प्रत कार्यवाहीस्तव

१) सर्व उपनियंत्रक, वैध मापन शास्त्र.
२) सर्व सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र.
३) सर्व निरीक्षक, वैध मापन शास्त्र. ( सहायक नियंत्रक यांचे मार्फत)